# मद्य विज्ञान-पोवाडा

– डॉ. प्रभाकर जामखेडकर

विज्ञानप्रसारासाठी पोवाडे माध्यमाचा उपयोग करण्याची कल्पना गेल्या वर्षी खिरोदा येथे भरलेल्या मराठी विज्ञान परिषदेच्या बाराव्या संमेलनात मांडण्यात आली. त्यानंतर काही वैज्ञानिक कविता व 'लोकसंख्यावाढीचा भस्मासूर' हा पोवाडा रचून व गाऊन दाखविला. या नव्या प्रयत्नांचे अनेकांनी कौतुक केल्याने "मद्य विज्ञान-पोवाडा" लिहिण्यास उद्युक्त झालो.

'दारू व त्याचे दुष्परिणाम' या विषयावर अनेक पोवाडे उपलब्ध आहेत; परंतु दारूचे शरीरावर होणारे दुष्परिणाम शास्त्रीयदृष्टया वर्णन करणारा पोवाडा बहुधा नाही. म्हणून वैज्ञानिक सत्यावर आधारित 'मद्यविज्ञान' हा पोवाडा रचला आहे. विज्ञानाद्वारा मद्यपानातील धोक्यांची जाणीव ऐकणारास व्हावी हा उद्देश कितपत यशस्वी झाला हे आपणच ठरवावयाचे आहे.

या विषयाचे महत्त्व ध्यानी घेऊन हा पोवाडा राष्ट्रास अर्पण केला आहे.

यासाठी तो कुणीही म्हणण्यास परवानगी देण्यात येत आहे. विनंती एव्हढीच, पोवाडे गायनाच्या वेळी "मराठी विज्ञान परिषदेच्या सौजन्याने" असा ऋणनिर्देश व्हावा.

o o o

**"मद्यपान हे अक्षम्य व्यसन आहे."**

**–ज. टेकचंद**

o o o

**"मद्यपानाची तरफदारी करणारे पुष्कळ आहेत, पण मद्याची तरफदारी होऊच शकत नाही."**

**–अब्राहम लिंकन**

o o o

**"दारू ही कुठल्याही स्वरूपात आणि कुठल्याही समाजात विषच आहे."**

**– डॉ. गिल्डर**



## विज्ञान शाहीर प्रभाकर

**सुप्रसिद्ध कविभूषण महाराष्ट्र शाहीर प्रल्हादराय जामखेडकर, जळगाव, यांचे तृतीय चिरंजीव. जन्म 10 ऑक्टोबर 1932, बिल्दी, ता. पाचोरे येथे. शिक्षणाने व व्यवसायाने पशुविज्ञानाशी निगडित.**

**लहाणपणापासून शाहीरी वाङ्मयाचे व गायनाचे बाळकडू. परंपरागत शाहीरी वारसा समर्थपणे चालू ठेवलेला. विद्यार्थीदशेपासून स्वतंत्रपणे पोवाडे लेखनास व गायनास सुरवात. रेडिओवर अनेक वर्षे पोवाडे गायनाचे कार्यक्रम सादर.**

**ग्रामीण भागात विज्ञान प्रसारासाठी पोवाडे माध्यमाचा हिरहिरीने पुरस्कार. आता पर्यंत विज्ञान नमन, लोकसंख्यावाढीचा भस्मासूर, मद्यविज्ञान व नवी गोमाता – 'संकर' देवाचा चमत्कार इत्यादि "विज्ञान पोवाडे प्रसिद्ध केले. अनेक विज्ञान लेख व कविता लेखन झालेले. खेडोपाडी विज्ञान प्रसार हे व्रत.**

## मद्यविज्ञान–पोवाडा

(विज्ञान शाहीर : **प्रभाकर जामखेडकर**)

पिणाऱ्यांनो पिण्यापूर्वी ऐका । अन्नु आणि पैका ।
बुद्धि अनू बायका । फुका पाण्यात कारे मिळविता ।
चढू द्या मद्य विज्ञानाची नशा । शाहीर म्हणे
"जीवनाची" चव चाखा ॥ धृ. ॥
चर्चिल (पाटील) मद्या बाबत बरळला । बाधत नाही मला ।
मीच बाधतो प्याला । सर्वगुण फक्त कोळून प्यालो ।
तावून सुलाखून तरी राहिलो । दुर्गुणांना मात्र नाही शिवलो ॥
गैरसमज असे प्रचलित । थोरामोठ्यात । गरीबश्रीमंतात ।
गुण जे नाही कधी मद्यात । बेलाशक त्याच्या माथी मारतात ।
ग्लासावर ग्लास रिते करतात ॥
'कोल्ड बियर सोल्ड हियर'। एव्हरीव्हेयर । पोरी आणि पोर ।
फॅशन पिण्याची वाढली फार । उच्चमध्य महिलांचा पुढाकार ।
घरोघरी स्थापन झाले मिनी बार ॥
अजून एक नवी स्टाइल । पार्टी कॉकटेल । सार आलबेल ।
गोलमाल भारी तिथे होत । मदिरा भक्त झिंगतात ।
धर्मावर चर्चा रंगतात ॥
चाल : तीर्थ प्राशन करता घोटभर । शीण जातो पळून दूर दूर ॥
जरा बर वाटत पळभर । मोकळेपणा वागण्यात येणार ॥
दिल खोलून बात करणार । दोस्ती कुणाशीही जमणार ॥

चाल :
(कटाव)
ब्रॅन्डीपेक्षा व्हिस्की ही बरी ।
बियर बिचारी थंडी सारी ।
लाईम कॉर्डेल 'जिन' घेती नारी ।
रम जणू जवानांची प्यारी ।
पोर्ट, वाइन अन् शँपेन शेरी ।
मूर्खपणाची कमाल सारी ।
मदिरेची रूप न्यारी न्यारी ।
सर्वामध्यें मद्यांश विषारी ।
इथिल अल्कोहोल नावच भारी ।
औंसभर व्हिस्कीमधे 70 कॅलरी ।
बियर बाटलीमधे 300 कॅलरी ।
काही प्यायला तरी मद्य विखारी ।
स्कॉचवाल्याची मिजास भारी ।
भारतीय मालाची शिसारी ।
90 टक्के स्कॉच भेसळ सारी ।
गटारगंगा पिती खरोखरी ।

हातभट्टीची वेगळी खुमारी ।
नवटांकवाल्यांना पहिल्याधारी ।
'कॉटेज इंडस्ट्री' फुलली भारी ।
कामगार बंधू अन् मजूर, शेतकरी ।
पगार मिळताच होती भिकारी ।
खोपडी झोपडीमधे हाहाकार करी ।
किती जाती मरणाच्या दारी ।।

चाल : ही नूर बदलते स्वारी ।
'चार' ढंग दाविते खरी ।।

चाल : एक दशांश टक्क्यावर "धोकेबाज" ही स्वारी ।।
चार दशांश टक्क्यावर "झिंगून पडते" स्वारी ।।
पाच दशांश टक्क्यावर "ठार प्यालेली" स्वारी ।।
टक्केवारी वाढता 'स्वारी' स्वर्गाच्या दारी ।।

चाल : एक पेग किंवा दहा पेग ।
मद्य अपायकारी देहास ।
इथिल अल्कोहोल हा खास ।
मद्यार्क सर्व मद्यात ।
थेंब पडता त्याचा तोंडात ।
किंवा जिभेलाही लागताच ।
तत्काळ शोषला जात ।
रक्ताद्वारे जात शरीराच्या कानाकोपऱ्यात ।।
अन्न नसलं काही पोटात ।
90 टक्के शोषला जात ।
पाणी जिगर दोस्त सर्वात ।
मेंदू आणि यकृत पेशीत ।
पाण्याचे प्रमाण मुबलक ।
म्हणून हल्ला पहिल्यांदा मेंदू, यकृतावर ।।
तज्ज्ञांनी लावला शोध ।
पेशींना अपाय कसा होत ।
केशवाहिन्या रक्त वाहतात ।
लालपेशी असती रक्तात ।
प्राणवायु पेशींना देतात ।
मद्यार्क इजा करतात ।
केशवाहिन्या तुंबून पडतात ।
प्राणवायु रोखून धरतात ।
प्राणवायु अभावी प्राण पेशीचा जात ।।
मेंदूपेशी नष्ट होता नाही पुन्हा जन्मत ।।

चाल : यकृत ग्रंथी सर्वात मोठी, जणू आरोग्याचे मंदीर ।
मंदिर पाडूनी देह देवाचा, बेचिराख का करणार ।।

पेशींमध्ये चरबी जमूनी, सूज आणते यकृतास ।
अशा वेळी थांबवलं पिणं तर, ढिला थोडासा गळफास ।।
ढसाढसा ढोसण्याने देहाचा, नाश पुरेपूर होणार ।
जठराची अन् स्वादू पिंडाची, आग सदोदित होणार ।।
अतिरेकाचा कहर केला तर, दगड यकृताचा होणार ।।
'दगड' मृत्यूचा देहास लागता, यातून कसे तुम्ही जगणार ।।

चाल : काही तज्ज्ञ पिणारे म्हणती ।
एकाग्रता तशी स्मरणशक्ती ।
मेंदूकेंद्र उत्तेजित होती ।
निर्णयाची धार वाढविती ।
याच्या अगदी उलट आहे स्थिती ।
मज्जासंस्था बधिर होते, लुप्त सारासार शक्ती ।।
नसानसात भिनते विषबाधा ।
गंभीर मेंदूविकार सर्वदा ।
स्मृतिभ्रष्ट, कष्ट शिकण्याला ।
निर्णयशक्ती नष्ट झालेला ।
तरी मोटार हाकूनी, अपघात लावतो वाढीला ।।
हृदयावर हल्ला जसा झाला ।
बेताल करती तालाला ।
नाडीची गाडी खड्‌डयाला ।
रक्तक्षय खचित ठरलेला ।
जखम होताच रक्ताची धार वाहि भळभळा ।।
हृदयाचे स्नायु कमजोर करती वक्ताला ।।

चाल : देहाचा होतो खोका । केव्हढा हा धोका । प्रसंग हा बाका ।
छीः थूः समाजात साऱ्या होते । नागिण मृत्यूचा विळखा आवळते ।
तरी अक्कल गहाण पडलेली असते ।।
यकृताचा होता दगड । बुद्धि बोजड । तेव्हा म्हणे सोड । वेड हे नको नको आता । उशीर फार झाला जाग येता । मृत्यू हेच औषध बाकी आता ।।
भरू नका एकच प्याला । एकदा का प्याला । सुधाकर झाला । कोठचावधि सिंधूंची तव आण । पिण्यातील धोका आता तरी जाण । अतिरेक करी सारी धूळधाण ।।
विडी किंवा पान सिगारेट । दारूचा घोट । व्यसने वाईट । मनोनिग्रह हाच उपाय । दारू, तंबाखू, सुपारीच काय । निश्चयानं काढती व्यसन पाय ।।
चर्चिल (पाटील) काही जरी बरळला । भुलू नका त्याला । पिण्याचा धोका । ध्यानी घेऊनी करा सुविचार । नष्ट होण्यापूर्वी करा उपचार । 'प्रभाकर' सांगे विज्ञानाचं सार ।। 1 ।।

डी–80, ब्लॉ. क्र. 796,
गांधीनगर, वांद्रे पूर्व,
मुंबई–400 051.